**विकास योजना मंठा ,जि. जालना**
**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना**
**अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) अन्वये**
**भागश: मंजूरीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**
**शासन निर्णय क्र. टिपीएस-२९१९/९२१/प्र.क्र.७९/२०१९/नवि-३०,**
**दिनांक - ०६ जानेवारी, २०२१**

**शासन निर्णय :-** सोबतची अधिसूचना महाराष्ट्र शासन साधारण राजपत्राच्या, औरंगाबाद विभागीय पुरवणीमध्ये प्रसिद्ध करण्यात यावी.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.**

Veena More
Digitally signed by Veena More
DN: CN = Veena More, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Urban Development Department
Date: 2021.01.06 15:52:20 +05'30'

**( वीणा मोरे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत**

१) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२) मा. मंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३) मा. राज्यमंत्री, नगर विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
४) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-४०० ०३२.
५) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-४०० ०३२.
६) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-४०० ०३२.
७) मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-४०० ०३२.
८) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-४०० ०३२.
९) प्रधान सचिव (नवि-१) नगर विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१०) संचालक (नगर रचना) तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**प्रति,**

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे.
२) विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
३) सहसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
४) जिल्हाधिकारी, जालना
५) नगर रचनाकार, नगर रचना, जालना शाखा, जालना.
(त्यांना कळविण्यात येते की, सोबतच्या अधिसूचनेच्या अनुषंगाने अधिप्रमाणित करण्यात यावयाच्या विकास योजनेच्या पाच प्रती शासनास विहीत मार्गाने सादर करण्यात याव्यात.)
६) मुख्याधिकारी, मंठा नगर पंचायत,मंठा, जि. जालना.
७) व्यवस्थापक, शासकिय मुद्रणालय, औरंगाबाद.
/- त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्राच्या भाग-१ औरंगाबाद विभाग, औरंगाबाद पुरवणी भाग १ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी ५ प्रती या विभागास, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व सहसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद, नगर रचनाकार, जालना शाखा, जालना, मुख्याधिकारी मंठा नगर पंचायत, मंठा जि. जालना यांना पाठवाव्यात.
८) निवडनस्ती (नवि-३०).

*****

<u>अधिसूचना</u>

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- ०६ जानेवारी, २०२१**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना, अधिनियम १९६६**

**क्रमांक टिपीएस-२९१९/९२१/प्र.क्र.७९/२०१९/नवि-३०** - ज्याअर्थी, मंठा नगर पंचायत, जिल्हा जालना (यापुढे " उक्त नियोजन प्राधिकरण" म्हणून संबोधलेले आहे.) या नियोजन प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना, अधिनियम १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम " असा उल्लेख करणेत आलेला आहे. चे कलम २३ (१) अन्वयेच्या तरतूदीनुसार ठराव क्र.०२, दि. २० जुलै,२०१५ अन्वये त्यांच्या कार्यकक्षेचा प्रारुप विकास आराखडा- मंठा (यापुढे "उक्त विकास योजना" असा उल्लेख करणेत आला आहे.) तयार करणेचा इरादा जाहीर केला असून त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, औरंगाबाद विभागीय पुरवणी दि.१७ सप्टेंबर २०१५ मध्ये प्रकाशित झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाच्या कलम २५ अन्वये उक्त नियोजन प्राधिकरण यांच्या कार्यकक्षेतील जमिनीचे सर्वेक्षण करुन, उक्त विकास योजना तयार करुन उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये प्रसिध्द केली असून, त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद भाग-१-अ पुरवणीमध्ये दि.१५ -२१ मार्च,२०१८ रोजी प्रसिध्द झाली आहे;

आणि ज्याअर्थी, सदरहू प्रसिध्द झालेल्या उक्त प्रारुप विकास योजनेवर विहीत मुदतीत आलेल्या हरकती व सूचनांचा विचार करुन उक्त अधिनियमाच्या कलम २८(२) नुसार स्थापन केलेल्या नियोजन समितीच्या सदस्यांनी त्यांचा अहवाल उक्त नियोजन प्राधिकरण यांच्याकडे सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरण यांनी उक्त विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम २८(४) अन्वये जनतेच्या अवलोकनार्थ प्रसिध्द केली असून, त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण औरंगाबाद विभाग, औरंगाबाद भाग-१-अ पुरवणीमध्ये दि. १३ आगस्ट , २०१८ रोजी पृष्ठ क्र.१ ते ३ वर प्रसिध्द झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील कलम ३० मधील उपकलम १ मधील तरतुदीनुसार उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त विकास योजना शासनास मंजूरीस्तव पत्र क्र.२९२, दि.२९ नोव्हेंबर, २०१८ अन्वये सादर केली आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम-३१(१) मधील तरतूदीनुसार उक्त विकास योजनेबाबत संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेऊन-उक्त विकास योजना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ ( SM -१ ते SM -७)मधील बदलासह भागश: मंजूर करणे आणि सूचना क्र. **टिपीएस-२९१९/९२१/प्र.क्र.७९(अ)//२०१९नवि-३०, दि.०६ जानेवारी, २०२१** सोबतच्या परिशिष्ट- ब मधील ( EP- १ ते EP -६) सारभूत फेरबदल उक्त विकास योजनेतून वगळणे आवश्यक झाले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) मधील सुधारित तरतुदीनुसार, उक्त विकास योजना उक्त नियोजन प्राधिकरण यांनी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१ (१)अन्वये शासनास सादर केलेल्या दिनांका पासून सहा महिने तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१)(ii) अन्वये १२

महिन्यांच्या वाढीव मुदतीसह दिनांक २८ मे ,२०२० पर्यंत उक्त विकास योजना शासनाने मंजूर करणे आवश्यक होते;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम १४८-क मधील तरतूदीनुसार, केंद्र शासनाचे निवडणूक आयोगाने किंवा राज्य शासनाचे निवडणूक आयोगाने त्यांचे कार्यक्षेत्रातील निवडणुकीच्या अनुषंगाने जाहीर केलेल्या आचारसंहितेमुळे विकास योजना,प्रादेशिक योजना किंवा नगर रचना योजनेची कार्यवाही पुर्ण होवू शकलेली नाही ,असा कालावधी गणना करतेवेळी वगळणेचा आहे;

आणि ज्या अर्थी , केंद्र शासनाचे निवडणूक आयोगाने किंवा राज्य शासनाचे निवडणूक आयोगाने त्यांचे कार्यक्षेत्रातील निवडणुकीच्या अनुषंगाने जाहीर केलेल्या आचारसंहितेमुळे ११० दिवसांचा कालावधी उक्त अधिनियमाचे कलम १४८-क नुसार वगळणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (सुधारणा) अधिनियम, २०२० (सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१९) द्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम १४८-क मधील सुधारित तरतुदीनुसार, अधिनियमातील प्रकरणे दोन, तीन, चार व पाच मधील तरतुदींप्रमाणे, कोणत्याही विकास योजना, प्रादेशिक योजना किंवा योजनांसाठीचा कालावधी विचारात घेतांना, देशामध्ये किंवा राज्यामध्ये उद्भवणाऱ्या कोणत्याही महामारीच्या किंवा साथीच्या रोगाच्या फैलावास किंवा आपत्तीजन्य परिस्थितीस प्रतिबंध करण्याकरिता, भारत सरकारने किंवा, यथास्थिती, राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही मार्गदर्शक तत्वांच्या किंवा टाळेबंदी उपाययोजनांच्या अंमलबजावणीमुळे, उक्त प्रकरणांनुसारची कोणतीही कार्यवाही पूर्ण होऊ शकली नसेल तर, असा कालावधी वगळणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यात शासनाने दि.२३/०३/२०२० पासून कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे जाहीर केलेला टाळेबंदीचा कालावधी अद्यापि अस्तित्वात असल्याने सदर कालावधी उक्त अधिनियमाचे कलम १४८(क) नुसार वगळणे आवश्यक आहे;

आणि त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) मधील तसेच या अनुषंगीक शासनास असलेल्या शक्तीचा वापर करुन शासन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

अ) उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) नुसार उक्त विकास योजनेच्या मंजूरीसाठी, उक्त अधिनियमाचे कलम )१४८कनुसार ( निवडणूकांच्या आचारसंहितेचा दिवसांचा ११० कालावधी व महाराष्ट्र राज्यात शासनाने दि.२३/०३/२०२० पासून कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे जाहीर केलेला टाळेबंदीचा कालावधी वगळण्यात येत असून, उक्त विकास योजना भागश: मंजूरीसाठी मंजूरीच्या अधिसूचनेच्या दिनांकापर्यंत मुदतवाढ मंजूर करण्यात येत आहे.

ब) मंठा नगर पंचायतीच्या विकास योजनेस सोबतच्या परिशिष्ट- अ मधील बदलासह मंजूरी देणेत येत आहे व यावेळी सूचना क्र. टिपीएस-२९१९/९२१/प्र.क्र.७९(अ)/२०१९/नवि-३०, दि. ०६ जानेवारी, २०२१, सोबतच्या परिशिष्ट-ब मधील सारभूत बदल वगळण्यात येत आहेत.

क) मंठा नगर पंचायतीची भागश: मंजूर विकास योजना सदर अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसानंतर अंमलात येईल.

०१. उपरोक्त नमूद भागश: मंजूर अंतिम विकास योजना-मंठा, जनतेच्या अवलोकनार्थ कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत मंठा नगर पंचायतीच्या

कार्यालयात सदर विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून एक महिन्यापर्यंत उपलब्ध करण्यात येत आहे.

०२. सोबतच्या परिशिष्ट -अ व परिशिष्ट -ब मध्ये नमूद नसलेली आरक्षणे, निर्देशने उक्त विकास योजनेत दर्शविण्यात आलेल्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आलेली आहेत.

०३. विकास योजना अहवालात नमूद केलेले आरक्षणाचे क्षेत्र अंदाजे असून, अंतिम विकास योजनेत दर्शविलेल्या आरक्षणाच्या हद्दीनुसार जागेवर प्रत्यक्ष मोजणीनुसार अंतिम राहील.

०४. आरेखनातील चुका जागेवरील प्रत्यक्ष परिस्थितीनुसार अथवा नगर भूमापन अभिलेखानुसार , मंजूर रेखांकन इत्यादिनुसार पडताळणी करून, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पूर्व परवानगीने मुख्याधिकारी, मंठा नगर पंचायत दुरूस्त करू शकतील.

०५. खाजगी मालकीच्या जागेवर विकास योजनेत दर्शविलेला अस्तित्वातील सार्वजनिक / निमसार्वजनिक वापर बंद झाल्यानंतर किंवा विकास योजनेत आरेखक चुकीमुळे सार्वजनिक/निमसार्वजनिक वापर दर्शविला असल्यास, सदर जागेवर विभागीय सहसंचालक नगर रचना, यांच्या पूर्वसंमतीने विकास योजनेतील लगतचा वापर अनुज्ञेय राहील.

०६. मंजूर रेखांकनातील खुल्या जागा हया उक्त मंजूर विकास योजनेत विद्यमान खुल्या जागा म्हणून (हिरव्या रंगात) दर्शविल्या असतील तर रेखांकन सुधारित करतेवेळी बदलता येतील व अशा खुल्या जागा सुधारित रेखांकन मंजूर करतेवेळी अन्य ठिकाणी प्रस्तावित केलेल्या असल्यास, अशा विद्यमान खुल्या जागाखालील क्षेत्र रहिवास क्षेत्र म्हणून ग्राहय धरण्यात येईल.

०७. शासनाच्या नगर विकास विभागाची अधिसूचना क्र.टिपीएस-१८१८/प्र.क्र. २३६/१८/ कलम-३७(१कक)(ग) व कलम २०(४)/नवि-१३ दिनांक ०२/१२/२०२० अन्वये मंजूर केलेली एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली व त्यामध्ये वेळोवेळी होणा-या बदलासह उक्त विकास योजनेस लागू राहील.

सदरची सूचना महाराष्ट्र शासनाचे www.maharashtra.gov.in/कायदे व नियम या संकेतस्थळावर उपलब्ध केलेली आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशाने व नावाने.**

Veena More

Digitally signed by Veena More
DN: CN = Veena More, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Urban Development Department
Date: 2021.01.06 15:52:46 +05'30'

**( वीणा मोरे )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**NOTIFICATION**
**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development Department**
**Mantralaya, Mumbai 400 032.**
**Date :- 06 January, 2021**

Maharashtra Regional & Town Planning Act 1966

**No.TPS-2919/921/C.R.79/2019/UD-30** :- Whereas, the Mantha Nagar Panchayat Dist. Jalna (hereinafter referred to as "the said Planning Authority") being the Planning Authority within it's jurisdiction vide its Resolution No.2, dated 20 July 2015 declared its intention under section 23 (1) of the Maharashtra Regional & Town Planning Act 1966 (Maharashtra Act no. XXXVII of 1966) (hereinafter referred to "the Said Act') to prepare Draft Development plan of Mantha for the area within the limits of the Mantha Nagar Panchayat (hereinafter referred to as "the said Development Plan') and notice of such declaration was published in the Maharashtra Government Gazette, Aurangabad Division supplement dated the 17 September , 2015;

And whereas, the said Planning Authority after carrying out survey of the entire land within the jurisdiction of the said Planning Authority as required under section 25 of the said Act, published a notice in Official Gazette, Part-1-A, Aurangabad Division Supplement dated the 15 - 21 March, 2018 for inviting objection or suggestions to the Draft Development Plan of Mantha prepared by it under sub section (1) of section 26 of the said Act;

And whereas, after considering the suggestions and objections received on the said Development plan, the Planning Committee, set up under section 28(2) of the said Act has submitted its report to the said Planning Authority;

And whereas, the said Planning Authority published the said Development plan so modified for information of the public under sub-section (4) of Section 28 of the said Act by a notice published in the Maharashtra Government Gazette, Part - 1-A Extra Ordinar, Aurangabad Division, dated 13 August, 2018, on page No.01 to 03;

And whereas, in accordance with the provisions of Section of 30(1) of the said Act, the said Planning Authority has submitted the said Development Plan to the Government of Maharashtra for sanction Vide its Marathi letter No.292, dated 29 November, 2018;

And whereas, in accordance with sub-section (1) of section 31 of the said Act, after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, the State Government has decided to sanction part of the said Development Plan with modifications shown in SCHEDULE-A (as SM- 1 to SM- 7) excluding the substantial modification shown in SCHEDULE-B (as EP -1 to EP-6) appended with Notice No. TPS-2919/921/C.R.79(A)/ 2020/UD-30, dated-06 January, 2021;

And whereas, in accordance with the amended provisions of section 31(1) of the said Act, considering the period of six months and extended period of twelve months as mentioned in section 31(1)(ii) of the said Act , State Government is required to sanction the said Development Plan on or before 28 May,2020 .

And whereas, in accordance with the provisions of Section 148-A. of the said Act in computing the period, in relation to any Development Plan, Regional Plan or Scheme the period or periods during which any action could not be completed due to enforcement of any Code of Conduct by the Election Commission of India or the State Election Commission in respect of any Election shall be excluded;

And whereas, in accordance with the provisions of Section 148-A of the said Act, due to Code of Conduct by the Election Commission of India or the State Election Commission in respect of Election, the period of 110 days, shall have to be excluded.

And whereas, in accordance with the amended provisions of section 148-A of the said Act, vide the Maharashtra Regional and Town Planning (Amendment) Act, 2020 (Maharashtra Act No. XIX of 2020), in computing the period, in relation to any Development Plan, Regional Plan or Scheme under the provisions of Chapter II, III, IV and V of the said Act, the period or periods during which any action could not be completed under the said chapters, due to enforcement of any Guidelines or lockdown measures by the Government of India or the State Government, as the case may be, to prevent the spread of any pandemic or epidemic or disaster situation arising in the Country or State shall be excluded;

And whereas, in accordance with the amended provisions of section 148-A,such prescribed time limit for sanctioning the said Development Plan (Partly) is still in existence due to exclusion of the period of lockdown, declared by the Government from 23/03/2020, due to spread of Covid-19 virus in the State of Maharashtra;

Now therefore, in exercise of the powers conferred by sub-section (1) of Section 31 of the Said Act and of all other powers enabling it on that behalf, the Government of Maharashtra hereby:-

A) For sanctioning the said Development Plan (Partly), as per the provision of Section 148 (A), the period of 110 days for the code of conduct for elections and the period of lockdown declared by the Government due to spread of Covid-19, from 23.03.2020 is excluded and accordingly, Government sanctions the extension of time limit for sanctioning the said Development Plan (Partly) up to the date of Notification of sanctioning the said Development Plan (Partly).

B) Sanctions the said draft Development plan for Mantha Nagar Panchayat along with modifications as specified in Schedule of Modifications namely SCHEDULE-A appended hereto, excluding the proposals under substantial modifications as specified in SCHEDULE-B appended with Notice No**.** TPS-2919/921/C.R.79(A)/ 2020/UD-30, dated-06 January, 2021;

C) The date after 30 days of publication of this Notification in the official Gazette will be the date on which the Said Sanctioned Development plan (partly), called the Final Development Plan of Mantha Nagar Panchayat shall come into force.

01. The aforesaid Part Final Development Plan Mantha sanctioned by the State Government shall be kept open for inspection by the public during office hours on all working days for a period of one month from the date of coming into force of this Notification, in the office of the Mantha Nagar Panchayat, Dist. Jalna.

02. The reservations / allocations / designations which do not appear in the Schedule-A and Schedule-B appended hereto, are hereby sanctioned for the respective purposes as designated in the Development Plan.

03. Areas of reserved sites mentioned in the report of the Development Plan are approximate and subject to actual measurement on site as per boundaries shown on the Final Development plan.

04. Draftsman's errors which are required to be corrected as per actual situation on site/or as per Survey Records , sanctioned layout etc. shall be corrected by the Chief officer, Nagar Panchayat Mantha after due verification and prior approval of Director of Town Planning, Maharashtra State , Pune

05 on cease of existing Public-Semi Public use shown in the Development Plan on the private lands or the Public Semi Public zone which had been shown inadvertently due to draftsman error, the use as per adjoining major land use zone shall be permitted on such lands with prior approval of Divisional Joint Director of Town Planning.

06. Those open spaces from sanctioned layouts that are earmarked as existing open spaces (in Green color) on Development plan are subject to changes if respective layouts are revised. If the layout is revised and if open space is shown elsewhere in Residential Zone, then the existing open space in the layout as shown on the Development Plan be treated as Residential Zone.

07. The Unified Development Control and Promotion Regulations for Maharashtra State as sanctioned by the Government vide Notification No.TPS-1818/C.R.. 236/18/Sec.-37(1AA)(C) & Sec 20(4)/UD-13and as amended from time to time shall be applicable to the said Development Plan.

This Notification shall also be made available on Govt. website www.maharashtra.gov.in (Acts/rules)

**By order and in the name of Governor of Maharashtra,**

Veena More

Digitally signed by Veena More
DN: CN = Veena More, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Urban Development Department
Date: 2021.01.06 15:53:09 +05'30'

**( Veena More )**
**Under Secretary to Government**

**SCHEDULE - A**

**MODIFICATIONS SANCTIONED BY THE GOVERNMET IN RESPECT OF PART FINAL DEVELOPMENT PLAN MANTHA, DIST. JALNA (ACCOMPANIMENT TO THE GOVERNMENT NOTIFICATION TPS-2919/921/CR-79/2019/UD-30 DATED-06 January, 2021)**

| Sr. No. | Modific-ation No. | Site No./ Location | Proposal as per Development Plan published u/s 26 of M.R. & T.P. Act, 1966 | Proposal as per Development Plan submitted to State Government for sanction u/s 30 of the M.R. & T.P. Act, 1966 | Modification sanctioned by the Government u/s 31 (1) of the M.R. & T.P. Act, 1966 |
|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** |
| 1 | SM-1 (M-1) | Site No.13 Gut No.73(part) | Garden | Deleted and included in residential Zone. | "Site No.-13 Garden" in Gut No 73 is retained as per the plan published u/s 26(1) of the M.R. & T.P. Act, 1966, as shown on plan |
| 2 | SM-2 (M-2) | 15.0 mt. wide road on the north side of Site No. 14 | 15.0 mt. wide road on the north side of Site No. 14 | 15.0 mt. wide road on the north side of Site No. 14 is deleted. | 15.0 mt. wide road on the north side of Site No. 14 is retained as per the plan published u/s 26(1) of the M.R. & T.P. Act, 1966, as shown on plan |
| 3 | SM-3 (M-5) | Gut No. 8,9,48,49 | wrongly shown | Corrected | Corrected Gut numbers 8,9,48,49 sanctioned as per the plan submitted u/s 30 of the M.R. & T.P. Act, 1966, as shown on plan |
| 4 | SM-4 (M-6) | Road from Vidoli fata to | Road width 80 ft.(24.0 mt.) | Width of main road from Vidoli Fata to | Road width of 24 mt. from Vidoli fata to |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Shivaji Chowk and upto Usavad road | | Shivaji Chowk is shown to be 80 ft. and from Shivaji Chowk to Usavad road 33ft. | Shivaji Chowk and up to Usavad road is retained as per the plan published u/s 26 (1)of the M.R. & T.P. Act, 1966, as shown on plan |
| 5 | SM-5<br>(M-7) | Gut No. 39 | Residential Zone | Existing Mandir of kaikadi Samaj. | Sanctioned as per the plan submitted u/s 30 of the M.R. & T.P. Act, 1966, as shown on plan |
| 6 | SM-6<br>(M-8) | Site No. 7<br>Gut No. 41(part) | Shopping Centre, Vegetable Market, Parking Lot<br>Area 0.70 H. | Deleted and included in Residential Zone. | "Site No.-7 Shopping Centre , Vegetable Market ,Parking Lot<br>" in Gut No 41(P) is retained as per the plan published u/s 26(1) of the M.R. & T.P. Act, 1966, as shown on plan |
| 7 | SM-7<br>(M-9) | Bauddh Vihar in ward No.4, Samaj Mandir in ward No. 9, Virshaiv Cremation Ground in ward No.2 | Not shown on plan. | proposed to be shown on plan | Retained as per the plan published u/s 26(1) of the M.R. & T.P. Act, 1966, as shown on plan |

**By order and in the name of the Government of Maharashtra.**

Veena More

Digitally signed by Veena More
DN: CN = Veena More, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Urban Development Department
Date: 2021.01.06 15:53:33 +05'30'

**( Veena More )**
**Under Secretary to Government**